वर्ष : १३९

Regd.No. PCW/002/2018-2020-S.P.College Post-RNI No. 1755/57

केसरी

राष्ट्रीय ठेवा

• अंक २४० • पृष्ठे : ६+रविवार पुरवणी • चार रुपये • रविवार १ सप्टेंबर २०१९, पुणे C (शहर आवृत्ती)

# सिटी इंटरनॅशनल ग्रूप ऑफ स्कूलची पूरग्रस्तांना मदत

**पुणे :** सिटी इंटरनॅशनल ग्रूप ऑफ स्कूलच्या सातारा, वानवडी, औंध या शाखांनी कोल्हापूर, सांगली येथील पूरग्रस्तांना मदत करण्यासाठी पुढाकार घेतला. विद्यार्थ्यांनी खाद्यपदार्थ, कपडे आणि अन्य जीवनावश्यक वस्तू पूरग्रस्त भागातील नागरिकांसाठी पाठविल्या. मागील दोन आठवड्यांत विद्यार्थ्यांनी शाळांमध्ये या वस्तू जमा केल्या. या मोहिमेमध्ये मोठ्या संख्येने मुले सहभागी झाली होती. त्यांनी जीवनावश्यक औषधे, प्रथमोपचार साहित्य, कपडे, ब्लँकेट्स आणि बेडशीट्स, कँडल्स, टॉर्च, तांदूळ, डाळ, कडधान्य असे साहित्य गोळा केले. सिटी इंटरनॅशनल ग्रूप ऑफ स्कूलचे विश्वस्त व संचालक मौलिक शाह म्हणाले, पूरग्रस्तांना करण्यात आलेल्या या छोट्या मदतीतून मुलांमध्ये सामाजिक बांधिलकीची जाणीव निर्माण होईल.

